नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना
मंजूर निधीच्या विनियोगाबाबत

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-११९८/प्र.क्र.३०/नवि-०४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १२ मार्च, २०१८

शासन निर्णय :-

नगर विकास विभागाकडून विविध योजनांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजूर करण्यात आलेल्या निधीच्या विनियोग विहित कालावधीत न केल्यामुळे अशा अखर्चित झालेल्या निधी संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

अ. २०१३-१४ व त्यापूर्वीच्या वर्षात राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषदा/नगरपंचायती यांना नगर विकास विभागामार्फत वितरीत करण्यात आलेला व **अद्याप अखर्चित असलेला निधी तात्काळ व कोणत्याही परिस्थितीत दिनांक १७.०३.२०१८ पूर्वी शासन जमा करावा**.

ब. २०१४-१५ व २०१५-१६ या वित्तीय वर्षात राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/ नगरपंचायती यांना नगर विकास विभागामार्फत वितरीत करण्यात आलेला व अद्याप अखर्चित असलेला **निधी खर्च करण्यास दिनांक ३० जून, २०१८ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.**

क. २०१६-१७ या वित्तीय वर्षात राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती यांना नगर विकास विभागामार्फत वितरीत करण्यात आलेला व अद्याप अखर्चित असलेला **निधी खर्च करण्यास दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.**

ड. उपरोक्त (ब) व (क) नुसार दिलेली मुदतवाढ संपल्यानंतर **अखर्चित राहिलेला निधी त्यानंतर एक आठवडयात शासन जमा करावा.**

इ. उपरोक्त (अ) नुसार कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी, संबंधित आयुक्त, महानगरपालिका व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत यांची राहील. याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत त्यांनी आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना **दिनांक २०.०३.२०१८ पर्यंत अहवाल सादर करावा.** आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी याबाबतचा एकत्रित अहवाल **दिनांक ३१.०३.२०१८ पर्यंत नगर विकास विभागास सादर करावा**.

फ. उपरोक्त (ब) व (क) येथे विहित केलेल्या कालमर्यादेत सदर विकास कामे पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित **महानगरपालिका आयुक्त व मुख्याधिकारी** यांची राहील.

ग. त्याचप्रमाणे या कालमर्यादेत विकास कामे पूर्ण करण्याबाबत **जिल्हाधिकारी यांनी देखिल दर पंधरवड्यातून एकदा आढावा घ्यावा** व त्यांच्या स्तरावर प्रलंबित प्रस्ताव तात्काळ निकाली काढावेत.

घ. या शासन निर्णयानुसार विकास कामे पूर्ण करण्याबाबत **आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी दर पंधरवड्यातून एकदा आढावा घ्यावा** व विहित कालावधीत कामे पूर्ण करून घ्यावीत. त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

च. यासंदर्भातील कामे विहित कालावधीत पूर्ण करण्यात किंवा विहित मुदतीनंतर सदर निधी शासन जमा करण्यात कुचराई झाल्याचे आढळून आल्यास अशा प्रकरणी **संबंधितांविरूद्ध आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय यांनी जबाबदारी निश्चित करून आवश्यक कारवाई** शासनाकडे प्रस्तावित करावी.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१२१३३१२५३७२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc19db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18df8e09b3c7eece65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2018.03.12 13:46:37 +05'30'

(पां. जो. जाधव)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव नगर विकास विभाग (२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, मुंबई.
९. महालेखापाल कार्यालय, महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई उपनगर.
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, मुंबई
१५. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१६. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा
१७. मुख्याधिकारी, सर्व नगरपंचायती
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१९. निवडनस्ती, (नवि-०४)

*****